# सरदार मलिक - भाग १



नाव - सरदार मोहंमद मलिक
जन्मतारीख - माहीत नाही पण बहुधा १९२९ साल असावे.
जन्मगाव - तेव्हा पूर्व पंजाबमध्ये असलेले आणि आता भारतात असलेले कपूरथाळा.
मुले - अनू, अबू आणि दब्बू
कुठल्या चित्रपटाच्या संगीतासाठी सर्वात जास्त प्रसिध्दी - सारंगा

सरदार मलिक आपल्या वयापेक्षा वीस वर्षांनी लहान वाटत असत. ह्या गृहस्थांनी ५० आणि ६० च्या दशकांत चित्रपटांत संगीत दिग्दर्शक म्हणून काम केले असेल असे त्यांना पाहून वाटतच नसे. पण अर्थातच त्या काळची ती सुंदर गाणी त्यांनीच आपल्याला दिली होती. संख्येने मात्र ती खूप जास्त नव्हती.

ह्या संगीत दिग्दर्शकाला पत्रकार आणि इतर लेखकांचा तिटकाराच वाटत असे. कारण ह्यांनी एक सांगितलेले असायचे आणि ते मात्र दुसरेच काहीतरी छापून आणायचे. परंतु त्यांचा मुलगा अनू मलिक मात्र खूप यशस्वी झाला. तो आपल्या वडिलांना सांगत असे की जरा दमाने घ्या. सगळ्याच गोष्टी जीवाला लावून घेऊ नका व उगाच कुणाला बोलू नका. तुमच्या वेळची परिस्थिती वेगळी होती. आता आम्हाला आमची बाजू मांडू द्या.

सत्य म्हणजे मलिक साहेब स्पष्टवक्ते, लहरी आणि मनात येईल ते फटकन बोलणाऱ्यांपैकी एक होते. कुठल्याही गोष्टीवर आपले मत मांडताना ते मागेपुढे पहात नसत. मी त्यांच्या मुलाखतीसाठी त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा 'नव्या पिढीचे संगीतकार किंवा नव्या पध्दतीचे संगीत याखेरीज इतर कुठल्याही गोष्टी मला विचारा' असे त्यांनी स्पष्ट सांगितले आणि आमची प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे झाली -

- मुलाखत -

प्रश्न - मलिक साहेब, तुम्ही कुणाच्या प्रेरणेमुळे संगीताकडे आकर्षित झाला ?

उत्तर - खरं तर ही दैवी देणगी आहे, परंतु उस्ताद अल्लाउद्दिन खान हे माझे संगीतातील गुरू होते.

प्रश्न - हो का ? तुम्ही संगीत गुरू म्हणता म्हणजे तुमचे आणखी कोणी गुरूही होते का ?

उत्तर - हो, मी ज्यांच्याकडे नृत्य शिकलो ते उदयशंकर माझे नृत्यातील गुरू होते.

प्रश्न - खरं का ?

उत्तर - अगदी खरं. मी कथाकली, मणीपुरी आणि भरतनाट्यम मध्ये प्रावीण्य मिळवलं होतं. 'चालीस करोड' या चित्रपटात मोहन सेहगल सोबत नाचही केला होता. मोहन सेहगल पुढे जाऊन चित्रपट निर्माता झाला. परंतु लोकांची वृत्ती वीट येणारी असल्यामुळे मी नृत्य सोडून दिले.

प्रश्न - असं झालं का ? मग पुढे ?

उत्तर - मग माझ्या जीवनातले अध्यात्म गुरू फैज अहमद फैज आणि माँ आनंद माँ. ते अलमोऱ्याला होते, जिथे मी ५ वर्ष होतो. ह्या वर्षांमध्ये माझ्या मनातील अनेक विचारांचे सुस्पष्ट विवेचन करून घेण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या मनात येणारे असंख्य प्रश्न मी त्यांना विचारत असे आणि या विचारवंतांकडून बरंच काही शिकण्याचा प्रयत्न करीत असे. फैज अहमद फैज हे मोठे ज्ञानी गृहस्थ होते. त्यांचे धर्मांबद्दलचे मत तितकेसे चांगले नव्हते. ते म्हणायचे की सर्व धर्मांतील लोक आपलाच धर्म कसा चांगला हे पटवून देतात. त्यामुळे त्यापेक्षा अधिकाधिक ज्ञान कसे मिळवावे ते पहाणे जास्त चांगले.

त्यांच्या बोलण्याचा माझ्यावर चांगलाच परिणाम होत असे. ते मी समर्थपणे सांगू शकणार नाही. एक वेळ अशी आली की मी नास्तिक होतोय की काय असे वाटू लागले. पण ह्या विचाराला माझा ठाम नकार होता. पण तो सर्वशक्तिमान परमेश्वर चुकीचा कसा काय वागू शकतो हे मला कळत नसे.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music

that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com